**[४७५] महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात उप-ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार करण्याची बाब विचारार्थ.**

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक (५०(५))
दिनांक :- 13 DEC 2019

**टिपणी:** मराठी विश्वकोशाचे एकूण प्रस्तावित २३ खंडापैकी १ ते २० खंड प्रकाशित झाले आहेत. विश्वकोशाचा पहिला खंड १९७६ साली प्रकाशित झाला असून २० वा खंड २०१५ साली प्रकाशित झाला. विज्ञान व तंत्रज्ञानात नवनविन संशोधनामुळे मोठ्या प्रमाणात भर पडली असून नवनविन विद्याशाखा निर्माण होत आहेत. मानव्यशाखांमध्ये नव्या संकल्पना, विचारप्रवाह निर्माण होत असून या सर्व बदलांची नोंद घेण्यासाठी विश्वकोशातील नोंदी/लेख कालमर्यादित पूर्ण करणे काळाची गरज आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे संशोधन संस्थाच्या साहाय्याने विश्वकोशातील नोंदीचे/लेखांचे लेखन, समीक्षण, संशोधन करण्यासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञांना व संबंधीत विषयातील विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक, तज्ज्ञ व्यावसायीक, विशेषज्ञ यांचे सहाय्य, प्रत्यक्ष सहभागी करून घेण्याचा उल्लेख सामान्य प्रशासन विभागाच्या व दि.१७ जून १९६४ च्या शासन निर्णयात करण्यात आला आहे.

विश्वकोशाचे सर्व खंड पूर्ण करण्यास लागलेल्या प्रदीर्घ कालावधीमुळे विश्वकोशातील अनेक नोंदी आता कालबाह्य असून, त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सर्व विषयातील/ज्ञानशाखेतील झालेले बदल विचारात घेता विश्वकोशाचे अद्ययावतीकरण जलद गतीने करणे आवश्यक आहे. त्याबरोबरच अद्ययावतीकरण करताना विश्वकोशाचा मूळ दर्जा कायम ठेवून अद्ययावतीकरणाकरिता माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्व ज्ञान क्षेत्रातील माहिती एकाच वेळी उपलब्ध करुन त्याचे समीक्षण-संपादन करुन अंतिम नोंद करणे आवश्यक आहे. त्यासाठी विविध विषयांशी संबंधित ज्ञानमंडळे गठीत करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी विविध विद्यापीठे/शैक्षणिक संशोधन संस्था यांच्या सहकार्याने ज्ञानमंडळाच्या माध्यमातून अद्ययावतीकरणाचे काम सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:- विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करताना विविध विषयांच्या ज्ञानमंडळांमार्फत ही योजना कार्यन्वित करुन अद्ययावतीकरणाचे काम वेगाने होण्यासाठी खालीलप्रमाणे ज्ञानमंडळाची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

ज्ञानमंडळाचे स्वरुप व रचना:- विविध विद्यापीठे, शैक्षणिक संशोधन संस्थांमध्ये ज्ञानमंडळे कार्यरत असतील, विषयाच्या व्याप्तीनुसार विषयनिहाय/उपविषयनिहाय एकूण ६० किंवा अधिक ज्ञानमंडळे कार्यरत राहतील. एका ज्ञानमंडळांमध्ये विषयाशी सबंधित ३ ते ५ तज्ज्ञ, एक समन्वयक यांचा समावेश राहील.

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक (40(5))
दिनांक :- 13 DEC 2019

सर्व ज्ञानमंडळामार्फत त्यांना नेमून दिलेल्या विषयाच्या विश्वकोशातील नोंदीचे/माहितीचे संपूर्ण अद्ययावतीकरण तीन वर्षात पूर्ण करणे अपेक्षित असून याच माध्यमातून भविष्यात सातत्य पूर्ण अद्ययावतीकरणाची प्रक्रिया सुरु ठेवण्यात येईल.

वरील विषयास अनुसरून माहिती तंत्रज्ञान व संगणक शास्त्र ज्ञानमंडळा अंतर्गत उपज्ञानमंडळे स्थापन करण्यासंदर्भात दि.४ ऑक्टोबर, २०१९ रोजी प्रशासकीय कार्यालय, मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळाच्या मा.अध्यक्ष, श्री. दिलीप करंबळेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने उपज्ञानमंडळे स्थापनेच्या निर्णयाच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञान आणि संगणक विज्ञान या ज्ञानमंडळांतर्गत भौगोलिक संतुलन साधण्याच्या दृष्टीने विदर्भातील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि पश्चिम महाराष्ट्रातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे उपज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी संबंधित विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार करण्यात यावा यासाठी मान्यता देण्यात आली. त्या अनुषंगाने आपण सामंजस्य करार करण्यासाठी सोबत पाठविलेला कराराचा नमुना यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

सदरचा मसुदा सोबत जोडला आहे. हा मसुदा विद्यापीठाचे कायदा अधिकारी यांच्याकडुन तपासून घेण्यात आले असून, सदरचा मसुदा व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यास्तव सादर.

सबब, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात उप-ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात उप-ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

24, January, 2022
SO comp
(15)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात उप-ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार

## विषय:- माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान

**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्यात उप-ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार**

**विषय:- माहिती तंत्रज्ञान – संगणकविज्ञान**

| | |
|---|---|
| पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर तर्फे<br>कुलसचिव, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. पुणे-सोलापूर महामार्ग, केगांव, सोलापूर. | करार करुन देणार |

कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

आणि

| | |
|---|---|
| माहिती व तंत्रज्ञान ज्ञानमंडळ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीत मंडळ, पुणे तर्फे<br>(डॉ. रत्नदीप र. देशमुख)<br>समन्वयक | करार करुन घेणार |

डॉ. रत्नदीप र. देशमुख
समन्वयक
माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान ज्ञानमंडळ,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

## प्रकल्पाचे नाव – मराठी विश्वकोश अद्यावतीकरण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना दि.१९ नोव्हेंबर १९६० रोजी झाली. त्यानंतर मंडळाचे विभाजन होऊन स्वंतंत्र 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ' हे महाराष्ट्र शासनाने दि.१ डिसेंबर १९८० रोजी स्थापन केलेले मंडळ असून

विश्वकोशाच्या व्दारा जगातील विविध विषयातील ज्ञान मराठीत आणण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. आपला उद्देश अधिक परिणामकारक रीत्या साध्य करण्यासाठी विविध विद्यापीठांना ज्ञान्मंडळाच्याव्दारे सहभागी करून घेण्याकरीता विविध विद्यापीठाशी सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेतला आहे.

विश्वकोश मंडळाने आपल्या कार्यासाठी विविध विद्यापीठांचे सहकार्य घ्यावे असे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१७ जुन १९६४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.

त्याचबरोबर विद्यापीठाच्या दैनंदिन कामकाजाव्यतीर्रीक्त महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ विद्यापीठाच्या दैनंदिन कामकाजाव्यतीर्रीक्त पुढील उद्देश नमूद केले आहेत :

5) to extend the benefits of knowledge and skills for development of individuals and society by associating the university closely with local, regional and national problems of development.
6) to carry out social responsibility as an informed and objective critic, to identify and cultivate talent, to train the right kind of leadership in all walks of life and to held younger generation to develop right attitudes, interests, values.
9) to promote acquisition of knowledge in a rapidly developing and changing society and to continually offer opportunities of upgrading knowledge, training and skills in the context of innovations, research and discovery in all fields of human endeavor by developing higher educational network with use of modern communication media, information and communication technology and other emerging and future technologies appropriate for a learning society.
15) to strive to promote competitive merit and excellence as the sole guiding criterion in all academic and other matter relating to students.
Along with these in the section of Powers and Duties of Universities it is clearly mentions in point no. 55 which runs like this -
55) to promote by itself, or in co-operation with other universities the study of Marathi and the use of Marathi as a medium of instruction, study, research and examination, in adherence to the policies of the state government;

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 मध्ये देखील याबाबत नमूद आहे.
तसेच, मराठी विश्वकोशाच्या अद्यायावतीकरनासाठी ज्ञानमंडळे स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.विकोश २०१५/प्र.क्र.१७१ /भाषा-२, दि.२३ फेब्रुवारी २०१६ नुसार व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ यांच्या मान्यतेने समन्वयक, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्यात सामंजस्य करार करण्यांत आला आहे.

**योजनेचा उद्देश** – मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या २० खंडाची निर्मिती केला असून या २० खंडाच्या नोंदीचे अद्यावत करणे, विविध विषयावरील नव्या माहितिची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना परीशीष्ठ -१ नुसार करणे. प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ, उप-ज्ञानमंडळ स्थापन करून ही सर्वे ज्ञानमंडळे एकमेकांशी जोडणे व त्या आधारावर विश्वकोशाची पुढील रचना करणे हा उद्देश आहे.

**<u>योजनेचे स्वरूप -</u>**

1) मराठी विश्वकोश खंड १ ते २० मधील नोंदीच्या अद्ययावतीकरनाच्या प्रक्रियेमध्ये कालबाह्य झालेल्या नोंदी निश्चित करणे, विद्यमान नोंदीचे पुनेर्लाखेन करणे, नव्या नोंदी लिहून घेणे आदी विविध विषयांचा समावेश असेल. हे प्राथमिक काम झाल्यानंतर जगामध्ये प्रकाशित होणाऱ्या माहितीच्या साहायाने नोंदी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवणे याही कामाचा अंतर्भाव असेल. यासाठी उपज्ञानमंडळाची स्थापना करण्यात येत आहे.
2) या योजनेच्या अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठाने माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान या विषयाची उप-ज्ञानमंडळाची जबाबदारी घेण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**ज्ञानमंडळाची कार्यपद्धती,कामकाज पार पाडण्यासंबंधी अटी व शर्थी :-**

1) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर 'माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान' या विषयाच्या उप-ज्ञानमंडळाची जबाबदारी स्वीकारत आहे.
2) या उप-ज्ञानमंडळात एक समन्वयक आणि पाच तज्ञांचे सल्लागार मंडळ असेल. पाच तज्ञांच्या सल्लागार मंडळातील दोन तज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याशी संबधित असतील. उर्वरीत तंत्रज्ञाची निवड शैक्षणिक अहर्ता, अनुभव आणि ज्ञानमंडळामार्फत करावयाच्या कार्याला वेळ देऊ शकतील अशा तज्ञांची निवड करण्यात येईल. ही निवड मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष, विषयपालक आणि संस्था प्रतिनिधी यांच्या परस्पर विचार विनिमयाने करण्यात येईल. मराठी विश्वकोश निर्मीती मंडळातील विषय पालक हे ज्ञानमंडळाचे पदसिद्ध सदस्य असतील.

3) संबधीत विद्यापीठ / शैक्षणिक व संशोधन संस्थेतील मराठीतून संशोधनात्मक लेखन करण्याचा अनुभव असलेले विषयतज्ञ/ सेवानिवृत्त तज्ञ / संशोधक विद्यार्थी( M.Phil/Ph.D/ Other) यामधून समन्वयक परिशिष्ट १ मध्ये 'समन्वयक' या शीर्षाखाली नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या
पार पाडतील.

4) उप-ज्ञानमंडळाला आवश्यक कार्यालयीन सुविधा उदा. कार्यालय, इंटरनेट सुविधेसह संगणक, प्रिंटर इत्यादी व सल्लागार मंडळाच्या बैठकीसाठी आवश्यक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर उपलब्ध करून देईल.

5) माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान या विषयातील लेखकांची कार्यशाळा / प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी तसेच ज्ञानमंडळाचे काम परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे चालविण्यासाठी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आवश्यक ती सर्व मदत करेल. उप-ज्ञानमंडळाच्या माध्यमातून ज्या नोंदी तयार होतील त्यावर महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळाचा स्वामित्व हक्क राहील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या सहकार्याची योग्य ती नोंद घेण्यात येईल.

6) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे स्थापन करण्यात आलेल्या ज्ञानमंडळाची कालमर्यादा कमाल तीन वर्षाची असेल, कामाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार हा कालावधी कमी अधिक करता येईल.

7) नोंदीचे लेखन, समीक्षण-संपादन, भाषांतर करणाऱ्या तज्ञांना मराठी भाषा विभाग, शासन निर्णय,

क्र. मविवन-२०१३/प्र.क्र.७०/भाषा -२,दि.१० फेब्रुवारी २०१५ व शासन निर्णय क्र. मविवन-२०१३/प्र.क्र.७०/भाषा -२,दि.१० मार्च २०१५ नुसार मानधन / मोबदला महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळामार्फत देण्यात येईल.

8) नोंदीशी संबंधीत चित्रे, रेखाटने, नकाशे, चलचित्रे, ध्वनीचीत्रफ़ीत(Audio Visual) याबाबतचे मानधन / मोबदला मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत नियमानुसार देण्यात येईल.

9) या उप-ज्ञानमंडळामार्फत प्रतीवर्षी किमान २५० ते ३०० नोंदीचे लेखन, समीक्षण-संपादन कार्य पूर्ण करण्यात येईल.

10) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे स्थापन करण्यात आलेल्या उप-ज्ञानमंडळाचा उद्देश संबधीत विषयातील अद्ययावत व परिपूर्ण माहिती मराठी भाषेतून अभ्यासकांना, जिज्ञासूंना मिळावी असा असल्याने हे काम अधिक चांगल्या रीतीने करण्याकरीता आगामी काळात उप-ज्ञानमंडळाच्या कार्यपद्धतीत जे बदल करावे लागतील त परस्परांच्या विचार विनीमयातून करण्यात येतील.

11) 'माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान' या विषयाशी संबधित लोकांच्या मनात जागृती निर्माण व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मीती मंडळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने परस्पर विचार विनीमयातून उपक्रम राबविण्यात येतील.

12) उप-ज्ञानमंडळाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या नोंदीचा उपयोग त्या त्या विषयातील विद्यापीठ/ संस्था स्थरावरील अभ्यासक्रमासाठी व पूरक संदर्भ म्हणून विद्यार्थी, अभ्यासक व जिज्ञासूंना होईल. यासाठी संयुक्तपणे उपक्रमही राबविण्यात येतील.

माहिती व तंत्रज्ञानमंडळ, महाराष्ट्र राज्य
मराठी विश्वकोश निर्मीत मंडळ, पुणे तर्फे
समन्वयक (डॉ. रत्नदीप र. देशमुख)
(करार करुन घेणार)

डॉ.रत्नदीप र. देशमुख
समन्वयक
माहिती तंत्रज्ञान - संगणकविज्ञान ज्ञानमंडळ,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर तर्फे
डॉ. वि.भा. घुटे कुलसचिव, पु. अ. हो.
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. पुणे-
सोलापूर महामार्ग, केगांव, सोलापूर.
(करार करुन देणार)

कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

स्थळ- औरंगाबाद

दि.-

साक्षीदार- 1) Prof. R. S. Hegadi

2) Dr. S. D. Raut